नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे | Year - 3rd | अंक - १६७ | Issue - 167 | वार गुरुवार दि. ६ नोव्हेंबर २०२५ | Blow- Thursday Date 6 November 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# स्टारलिंकशी भागीदारी करणारे महाराष्ट्र भारतातील पहिले राज्य

## आता दुर्गम,अल्पसेवित भागांपर्यंत उपग्रहाधारित इंटरनेट सेवा पोहोचेल : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस




मुंबई : स्टारलिंक सॅटेलाईट कम्युनिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड (स्टारलिंक) आणि महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान विभागासमवेतच्या सामंजस्य करारामुळे अत्याधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध होणार आहे. यामुळे राज्यातील दुर्गम आणि अल्पसेवित भागांपर्यंत उपग्रहाधारित इंटरनेट सेवा पोहोचविण्याची दिशा ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

स्टारलिंक सॅटेलाईट कम्युनिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड (स्टारलिंक) आणि महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान विभागासमवेत सामंजस्य करारावेळी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी माहिती तंत्रज्ञान मंत्री ड.आशिष शेलार, माहिती तंत्रज्ञान विभागाचे सचिव वीरेंद्र सिंग, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी, नगर विकास विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. गोविंदराज, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, मदत व पुनर्वसन विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद - सिंघल, उद्योग विभागाचे सचिव पी.अन्बलगन, मुख्यमंत्र्यांचे मुख्य गुंतवणूक व धोरण सल्लागार कौस्तुभ धवसे, स्पेसएक्सच्या मुख्य कार्यकारी अधिकारी लॉरेन ड्रेयर, स्टारलिंक लिमिटेड कंपनीचे प्रतिनिधी मनोज लाडवा, महाआयटीचे महाव्यवस्थापक मकरंद कुरतडीकर उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीत सामंजस्य करारावर स्टारलिंकच्या उपाध्यक्ष लॉरेन ड्रेयर आणि महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान विभागाचे सचिव विरेंद्र सिंह यांनी स्वाक्षरी केली. यामुळे स्टारलिंकसोबत औपचारिक भागीदारी करणारे महाराष्ट्र भारतातील पहिले राज्य ठरले आहे.

**मुख्यमंत्र्यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रख्यात स्टारलिंक कंपनीशी माहिती तंत्रज्ञान विभागाचा सामंजस्य करार**

स्टारलिंक महाराष्ट्राशी भागीदारी करत असल्याने आपण राज्यातील शेवटच्या गावापर्यंतची डिजिटल दरी मिटवत आहोत. प्रत्येक शाळा, प्रत्येक आरोग्य केंद्र आणि प्रत्येक गाव आता डिजिटल संपर्कात येणार आहे, कितीही दुर्गम असो ही भागीदारी 'फ्युचर-रेडी' आणि पूर्णपणे जोडलेले महाराष्ट्र घडविण्याच्या आपल्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे. भारतातील पहिले राज्य म्हणून ही भागीदारी सुरू करताना अभिमान वाटत आहे. हे 'डिजिटल इंडिया'च्या ग्रामीण पातळीवरील आदर्श मॉडेल ठरेल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

आमचे ध्येय म्हणजे कुठेही, कोणत्याही पार्श्वभूमीतील लोकांना उच्च गतीची इंटरनेट सेवा उपलब्ध करून देणे असून महाराष्ट्र शासनासोबत या ऐतिहासिक सहकार्याचा भाग होणे आमच्यासाठी सन्मानाची गोष्ट आहे. स्टारलिंकचे ध्येय म्हणजे पारंपरिक पायाभूत सुविधांपासून वंचित राहिलेल्या लोकांना डिजिटल विश्वात सामील करणे हे आहे. महाराष्ट्राचे समावेशक आणि डिजिटल विकासाचा लवचिक दृष्टीकोन आमच्याशी पूर्णपणे सुसंगत आहे. एकत्र येऊन आपण उपग्रह इंटरनेटद्वारे शिक्षण, आरोग्य सेवा आणि ग्रामीण समुदायांना सक्षम बनविण्याचे उदाहरण निर्माण करु, असे स्टारलिंकच्या उपाध्यक्ष लॉरेन ड्रेयर यांनी सांगितले.

या माध्यमातून शासन संस्था, ग्रामीण समुदाय तसेच महत्त्वाच्या सार्वजनिक पायाभूत सुविधांसाठी उपग्रहाधारित इंटरनेट सेवा उपलब्ध करून दिली जाणार आहे. ही भागीदारी भारत सरकारकडून मिळणाऱ्या नियामक व कायदेशीर मंजुरींवर आधारित असणार आहे.

या धोरणात्मक भागीदारीअंतर्गत अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने महाराष्ट्र शासन आणि स्टारलिंक मिळून राज्यातील दुर्गम व अल्पसेवित भागांना जोडण्यासाठी कार्य करतील. यात आदिवासी शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्रे, आपत्ती नियंत्रण कक्ष, वन चौक्या, किनारी क्षेत्रे, तसेच गडचिरोली, नंदुरबार, धाराशिव आणि वाशिम या जिल्ह्यांचा समावेश आहे.

या उपक्रमाचा उद्देश राज्यातील महत्त्वाच्या पायाभूत सुविधा मार्गांवरही (जसे की समृद्धी महामार्ग, फेरी सेवा, बंदरे, किनारी पोलीस नेटवर्क) उपग्रहाधारित कनेक्टिव्हिटी उपलब्ध करून देणे आहे. तसेच शिक्षण आणि टेलिमेडिसिन क्षेत्रातही स्मार्ट कनेक्टिव्हिटीचा लाभ देण्याची योजना आहे.

या उपक्रमासाठी एक संयुक्त कार्यगट स्थापन करण्यात येणार आहे. या कार्यगटाद्वारे ९० दिवसांचा प्रायोगिक टप्पा अंतर्गत तीन टप्प्यांमध्ये ३०, ६० आणि ९० दिवस यानुसार पूर्ण केला जाईल. या प्रगतीचा आढावा दर तिमाहीला मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली घेतला जाणार आहे.

महाराष्ट्र-स्टारलिंक सहकार्यामुळे राज्याच्या 'डिजिटल महाराष्ट्र' या प्रमुख मिशनला अधिक गती मिळणार असून, हे उपक्रम राज्यातील ईव्ही, किनारी विकास आणि आपत्ती प्रतिकारशक्ती कार्यक्रमांशी सुसंगतपणे एकत्रित केले जाणार आहे.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हाती वर्ल्डकप, महिला टीम इंडियासोबत गप्पा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : विश्वविजेता महिला क्रिकेट संघाने आज पंतप्रधान नरेंद्र मोदींची भेट घेतली. पीएमओ निवासस्थानी पंतप्रधानांनी क्रिकेट विश्वात तिरंगा झेंडा उंचावणाऱ्या महिला खेळाडूंचं स्वागत केलं. विश्वचषक २०२५ मध्ये महिला टीम इंडियाने दक्षिण आफ्रेकिवर ५२ धावांनी विजय मिळवत इतिहास रचला, कर्णधार हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वात तब्बल ५२ वर्षांच्या इतिहासात प्रथमच महिला संघाने वर्ल्डकपवर आपलं नाव कोरलं.

पंतप्रधान मोदींनी यापूर्वीच टीम इंडियाच्या विजयाबद्दल ट्विटरवरुन अभिनंदन आणि कौतुक केलं होतं. मैदानावर भारतीय संघाच्या पोरींनी दाखवलेल्या धाडसी आणि शानदार खेळीचं आज पुन्हा एकदा कौतुक केलं.



पंतप्रधान मोदींच्या भेटीनंतर हरमन प्रीत कौरने २०१७ मधील भेटीची आठवण जागवली. २०१७ मध्ये भारतीय महिला संघ पंतप्रधानांना भेटला होता. पण, तेव्हा हाती ट्रॉफी नव्हती, असे हरमनप्रीतने म्हटले. स्मृती मंधानानेही पंतप्रधान नरेंद्र मोदी नेहमीच प्रोत्सहन आणि प्रेरणा देतात, असे म्हटले. मोदींचे शब्द प्रत्येक खेळाडूला एक नवी ऊर्जा देतात असेही तिने म्हटले. दरम्यान, या भेटीत मोदींनी टीम इंडियातील सर्वच खेळाडूंशी आपुलकीने संवाद साधला.

यावेळी, संघाकडून मोदींनी नमो लिहिलेली आणि सर्व खेळाडूंच्या सह्या असलेली खास जर्सीही गिफ्ट देण्यात आली. मंगळवारी भारतीय महिला संघ मुंबईतून दिल्लीत पोहोचल्यानंतर दिल्लीतही टीम इंडियाचं जल्लोषात स्वागत करण्यात आलं होतं.

दरम्यान, वर्ल्डकप चषकासह टीम इंडिया राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचीही भेट घेणार असल्याची सूत्रांची माहिती आहे.

# भाजपकडून महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्याचे निवडणूक प्रमुख ठरले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपने महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यातील निवडणूक प्रमुख निवडले आहेत. बीड जिल्ह्यातही महत्वाच्या नियुक्त्या केल्या आहेत. बीड जिल्हा निवडणूक प्रमुख पदी आमदार सुरेश धस तर निवडणूक प्रभारी म्हणून मंत्री पंकजा मुंडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. विधानसभा निवडणुकीनंतर धस-मुंडे वाद पहायला मिळाला होता. मात्र आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये दोघांनाही एकत्रित पक्षाचे काम करावे लागणार आहे.



भाजपच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक प्रमुख आणि निवडणुका प्रभारींची यादी पक्षाकडून जाहीर करण्यात आली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची घोषणा होताच भाजप क्शन मोडवर आले आहे. भाजपकडून जिल्हा निवडणूक प्रमुख आणि जिल्हा निवडणूक प्रभारी यांच्या नियुक्तीची घोषणा करण्यात आली आहे.

एकनाथ शिंदे यांच्या बालेकिल्ल्यात मंत्री गणेश नाईक यांची निवडणूक प्रभारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. ठाणे शहर, ग्रामीण, कल्याण, उल्हासनगर, मीरा भाईंदर, भिवंडी, नवी मुंबई या सर्व ठिकाणी गणेश नाईक निवडणूक प्रभारी असणार आहेत.

सिंधुदुर्ग जिल्ह्यात नितेश राणे निवडणूक प्रभारी तर पुणे ग्रामीण मध्ये गणेश बिडकर यांच्यावर निवडणूक प्रमुख म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे. तर मुंबईत आशिष शेलार हे निवडणूक प्रभारी असणार आहेत. त्याचबरोबर सोलापूर जिल्ह्यात मंत्री जयकुमार गोरे हे प्रभारी असणार आहेत. छत्रपती संभाजीनगरमध्ये मंत्री अतुल सावे हे निवडणूक प्रभारी असणार आहेत. तर नांदेड जिल्ह्यात खासदार अशोक चव्हाण हे निवडणूक प्रभारी असणार आहेत. त्याचबरोबर कोल्हापूर जिल्ह्यात खासदार धनंजय महाडिक हे निवडणूक प्रभारी असणार आहेत. रायगडमध्ये प्रशांत ठाकूर हे निवडणूक प्रभारी असणार आहेत. नाशिकमध्ये गिरीश महाजन तर जळगावमध्ये संजय सावकारे हे निवडणूक प्रभारी असणार आहेत. अहिल्यानगर जिल्ह्यात मंत्री राधाकृष्ण विखे पाटील हे हे निवडणूक प्रभारी असणार आहेत. तर पुणे जिल्ह्यात केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ हे हे निवडणूक प्रभारी असणार आहेत. रत्नागिरीत निरंजन डावखरे हे निवडणूक प्रभारी असणार आहेत, तर साताऱ्यात मंत्री शिवेंद्रराजे भोसले हे निवडणूक प्रभारी असणार आहेत.

# राज्यात रहिवासी क्षेत्रासाठी तुकडेबंदी कायदा रद्द : मंत्री बावनकुळे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील नागरी भागातील तसेच प्रादेशिक योजनांमधील बिगर शेती वापर अनुज्ञेय क्षेत्रावरील जमिनींसाठी तुकडेबंदी कायदा रद्द करण्यात आला आहे. याबाबत राज शासनाने नुकताच एक अध्यादेश जारी केला असून या अध्यादेशामुळे १५ नोव्हेंबर १९६५ पासून तुकडेबंदी कायद्यामुळे अडकलेली घरे आणि प्लॉट कायदेशीर करण्याचा मार्ग मोकळा झाल्याची माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंत्रालयात पत्रकार परिषदेत दिली.



तुकडेबंदी कायद्यावरील सुधारित अध्यादेश

या निर्णयासंदर्भात अधिक माहिती देताना महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, या अध्यादेशानुसार दि. १५ नोव्हेंबर १९६५ ते १५ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत झालेल्या अशा तुकड्यांच्या खरेदी-विक्री व्यवहारांना आता कोणतेही शुल्क न आकारता नियमित करण्यात येणार आहे. राज्य शासनाने घेतलेला हा निर्णय ऐतिहासिक असून या निर्णयाचा राज्यातील ४९ लाख परिवारांना लाभ होणार आहे.

**राज्यातील ४९ लाख तुकड्यांचे व्यवहार नियमित होणार; नियमितीकरणासाठी कोणतेही शुल्क नाही; शहरी व प्रादेशिक योजनांमधील बिगर शेती वापर क्षेत्रांना लाभ**

राज्यात सध्या अंमलात असलेला तुकडेबंदी कायदा हा कृषी क्षेत्रासाठी लागू आहे. या कायद्यानुसार बागायत किंवा जिरायत जमिनींसाठी ठराविक प्रमाणभूत क्षेत्र निश्चित करण्यात आले आहे. परंतु, वाढत्या नागरीकरणामुळे अनेकांनी शहर व गावांच्या सभोवतालच्या भागात आपल्या गरजेपोटी या प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्राचे व्यवहार केले आहेत. अशा व्यवहारांना आतापर्यंत कायदेशीर दर्जा मिळालेला नव्हता. यास्तव राज्य शासनाने ३ नोव्हेंबर २०२५ रोजी जारी केला असून त्याची तत्काळ अंमलबजावणी केली जाणार आहे.

हा निर्णय महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायतींच्या हद्दीतील क्षेत्र, मुंबई, पुणे, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणे (एमएमआरडीए, पीएमआरडीए, एनएमआरडीए) ग्रोथ सेंटर्स आणि विशेष नियोजन प्राधिकरणांतील क्षेत्र, तसेच युडीसीपीआरअंतर्गत शहर/गावांच्या परिघातील क्षेत्रांना लागू होणार आहे. ज्या जमिनींचे व्यवहार नोंदणीकृत आहेत पण ७/१२ उताऱ्यावर नावे नोंदलेली नाहीत, त्यांची नावे आता मालकी हक्क म्हणून नोंदवली जातील. तर नोंदणीकृत नसलेले (नोटरीद्वारे केलेले) व्यवहार असलेल्यांनी संबंधित सब-रजिस्ट्रार कार्यालयात नोंदणी करून आपले हक्क नोंदवता येतील,असेही महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

महसूल मंत्री बावनकुळे यांनी सांगितले की, महसूल विभागामार्फत याबाबत लवकरच सविस्तर कार्यपद्धती तयार करून सर्व विभागीय आणि जिल्हा स्तरावरील कार्यालयांना मार्गदर्शक सूचना देणार आहेत. या निर्णयामुळे राज्यातील लाखो नागरिकांना दिलासा मिळून जमिनींच्या मालकी हक्कांचे प्रश्न सुटणार असल्याचा विश्वासही महसूल मंत्री बावनकुळे यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केला.


**महसूल विभाग अधिक लोकाभिमुख करणार**

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले, महसूल विभाग अधिक लोकाभिमुख करण्याबरोबरच तो अधिक सक्षम, गतिमान करण्यावर शासनाने भर दिला आहे. सर्वसामान्य जनतेला सेवा गतीने देण्यासाठी महसुली कायद्यांमध्ये सुधारणा करण्यात येत आहेत. महसूल विभागातील अधिकारी कर्मचाऱ्यांची पदोन्नतीची प्रकरणे जलद गतीने मार्गी लावली जात आहेत. महसूलमंत्रीस्तरावर प्रलंबित असलेल्या केसेस/प्रकरणातील मागील आठ महिन्यात दोन हजार केसेस/ प्रकरणे मार्गी लावली आहेत. पुढील तीन वर्षांत एकही खटला प्रलंबित राहणार नाही असे सूक्ष्म नियोजन करण्यात आले आहे. राज्यात 'व्हर्टिकल सातबारा' देण्याचे नियोजन असून यात आधी मोजणी, मग खरेदीखत आणि त्यानंतर नोंदणी, अशी सुटसुटीत व्यवस्था असेल, असेही मंत्री बावनकुळे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

## श्री गुरु तेग बहादूर यांच्या ३५० व्या शहीदी शताब्दी समागम कार्यक्रमासाठी ९५.३५ कोटींची तरतूद

मुंबई : शिख धर्माचे नववे गुरू आणि 'हिंद-की-चादर' म्हणून ओळखले जाणारे श्री गुरु तेग बहादूर यांच्या ३५० व्या शहीदी शताब्दी समागम वर्षानिमित्त राज्यात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. या भव्य राज्यस्तरीय महोत्सवासाठी ९५ कोटी ३५ लाख ६४ हजार रूपये उपलब्ध करून देण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

जिल्हा परिषद व नगरपालिका निवडणूक



प्रचार साहित्य

अत्याधुनिक निवडणूक मोबाईल ॲप वापरा व हमखास निवडून या.

फक्त आमच्या कडेच

मतदार स्लिप नांव व मतदान केंद्रासहीत फक्त आमच्याकडेच मिळतील.

प्रचार साहित्य

१. डमी वोटिंग मशिन
२. झेंडे, टोपी,पंचा ३. बिल्ले
४. मतदार स्लिप ५.स्टिकर ६.पॉम्प्लेटस
७. स्लिप प्रिंटर ८. सॉफ्टवेअर
९. बॅचेस १0. एस.एम.एस./व्हाईस कॉल



नितीन कन्सलटन्सी

नितीन हलसगी

मो. 9595427070 / 9270325070

## संपादकीय....

### महत्त्वाचा निर्णय

राज्यातील नागरी भागातील तसेच प्रादेशिक योजनांमधील बिगर शेती वापर अनुज्ञेय क्षेत्रावरील जमिनींसाठी तुकडेबंदी कायदा रद्द करण्यात आला आहे. याबाबत राज शासनाने नुकताच एक अध्यादेश जारी केला असून या अध्यादेशामुळे १५ नोव्हेंबर १९६५ पासून तुकडेबंदी कायद्यामुळे अडकलेली घरे आणि प्लॉट कायदेशीर करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या अध्यादेशानुसार दि. १५ नोव्हेंबर १९६५ ते १५ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत झालेल्या अशा तुकड्यांच्या खरेदी-विक्री व्यवहारांना आता कोणतेही शुल्क न आकारता नियमित करण्यात येणार आहे. राज्य शासनाने घेतलेला हा निर्णय ऐतिहासिक असून या निर्णयाचा राज्यातील ४९ लाख परिवारांना लाभ होणार आहे. राज्यात सध्या अंमलात असलेला तुकडेबंदी कायदा हा कृषी क्षेत्रासाठी लागू आहे. या कायद्यानुसार बागायत किंवा जिरायत जमिनींसाठी ठराविक प्रमाणभूत क्षेत्र निश्चित करण्यात आले आहे. परंतु, वाढत्या नागरीकरणामुळे अनेकांनी शहर व गावांच्या सभोवतालच्या भागात आपल्या गरजेपोटी या प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्राचे व्यवहार केले आहेत. अशा व्यवहारांना आतापर्यंत कायदेशीर दर्जा मिळालेला नव्हता. यास्तव राज्य शासनाने ३ नोव्हेंबर २०२५ रोजी तुकडेबंदी कायद्यावरील सुधारित अध्यादेश जारी केला असून त्याची तत्काळ अंमलबजावणी केली जाणार आहे. हा निर्णय महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायतींच्या हद्दीतील क्षेत्र, मुंबई, पुणे, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणे (एमएमआरडीए, पीएमआरडीए, एनएमआरडीए) ग्रोथ सेंटर्स आणि विशेष नियोजन प्राधिकरणांतील क्षेत्र, तसेच युडीसीपीआरअंतर्गत शहर/गावांच्या परिघातील क्षेत्रांना लागू होणार आहे.

# खिद्रापूर : अद्भुत खगोलशास्त्रीय प्रकाश पर्वाचे ठिकाण



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

खिद्रापूर हे महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ तालुक्यातील एक छोटेसे गाव.. हे गाव कोल्हापूर शहरापासून साधारण ७० किमी अंतरावर आहे. खिद्रापूर म्हणजे अध्यात्म आणि मानवी सौंदर्याच्या मिलापावर लिहिलेली दगडातील कोरीव कविता आहे. खिद्रापूर येथील कोपेश्वर मंदिरात त्रिपुरारी पौर्णिमेच्या दिवशी एक अद्भुत घटना घडते.चंद्रप्रकाशाचा वर्तुळाकार कवडसा स्वर्गमंडपातील वर्तुळाकार झरोक्यामधून जमीनीवरील चंद्रशिलेसोबत तंतोतंत जुळतो.संपूर्ण भारतात हे प्रकाश पर्व प्रसिद्ध आहे. दिवाळीच्या दीपोत्सवात कोल्हापूर जिल्ह्यासाठी हे प्रकाश पर्व अध्यात्म आणि खगोलशास्त्रीय चमत्कार म्हणून हजारो वर्षांपासून चर्चेत आहे.

या प्रकाश-योगायोगाचा अनुभव घेण्यासाठी शेकडो पायांना खिद्रापूरच्या मंदिराची आठवण होते. दिवाळीनंतरच्या दीपोत्सवात कोल्हापूर व महाराष्ट्रासाठी ही एक पर्वणी असते. चंद्र प्रतिबिंबाचा हा सोहळा पाहण्यासाठी त्रिपुरारी पौर्णिमेच्या रात्री महाराष्ट्र, कर्नाटक व गोवा येथून अनेक पर्यटक येतात. खगोलशास्त्रीय दृष्ट्या या अनुभूतीला वेगळे महत्त्व आहे.हजारो खगोलशास्त्रीय, देश विदेशातील छायाचित्रणातील मान्यवर या ठिकाणी दिवाळीनंतर येणाऱ्या पौर्णिमेला अर्थात त्रिपुरारी पौर्णिमेला मध्यरात्री एकत्रित येतात. काही क्षणांसाठी वास्तुशास्त्र आणि खगोलशास्त्रातील अद्भुतता अनुभवण्यासाठी देशभरातील चिकित्सक अभ्यासक या ठिकाणी येत राहतात. त्यामुळे कोल्हापूर जिल्ह्यातील अनेक प्राचीन मंदिरांपेक्षा खिद्रापूरचे मंदिर लक्षणीय ठरते.

त्रिपुरारी पौर्णिमेच्या रात्री मंदिरातील हजारो दिवे प्रज्वलित होतात, भजन-कीर्तन, नृत्य आणि दीपोत्सवाचे कार्यक्रम होतात. हजारो वर्षांपासूनचा हा उत्सव या ठिकाणी सुरु आहे.अध्यात्म आणि विज्ञान या ठिकाणी हातात हात घालून निसर्गाच्या अद्भुत चमत्काराला अनुभवते.

त्रिपुरारी पौर्णिमेच्या रात्री जेव्हा चंद्र या मंदिरातील स्वर्ग मंडपाच्या गोलाकार भागावर येतो त्या ठिकाणावरुन चंद्राचा पूर्ण प्रकाश त्याच आकाराच्या चंद्रशिलेवर पडतो.काही सेकंदांचा हा पूर्णतेचा आनंद असतो. अगदी खगोलशास्त्रज्ञांच्या घड्याळातून घेतलेल्या अंदाजानुसार केवळ सहा ते बारा सेकंदाचा हा परिपूर्ण गोलाकारांचा प्रकाशीय मिलाप असतो. या दीपोत्सवासाठी ओळखल्या जाणाऱ्या या मंदिराचे वास्तु शिल्प देखील अभ्यासनायोग्य आहे. देशभरातील शिल्प प्रेमी या मंदिराला कायम भेटी देत असतात. हे मंदिर कृष्णा नदीच्या काठी वसलेले आहे,त्यामुळे नद्याच्या प्रवाहाप्रमाणे सजीव व बोलक्या शिल्प सौंदर्याची अनुभूती मंदिराच्या परिसरात कायम येत राहते.

कोपेश्वर मंदिर हे प्रामुख्याने शिव (महादेव) आणि विष्णू यांना समर्पित आहे. मंदिराची उभारणी साधारणतः चालुक्य व शिलाहार राजवटीत सुरू झाली असावी असे ऐतिहासिक मत आहे. नंतर ११-१२ व्या शतकात शिलाहार व यदुवंशीय राजे यांनी मंदिराचा विस्तार केला. मंदिराला भारत सरकारद्वारे राष्ट्रीय संरक्षित स्मारक म्हणून मान्यता दिलेली आहे.

कोपेश्वर मंदिर हे शिल्पकलेचे एक उत्कृष्ट उदाहरण आहे. ते शिलाहार शैली व मध्ययुगीन महाराष्ट्रातील मंदिरकलांचा संगम दर्शवते. मुख्य मंडप, आच्छादित मंडप, अंतराळ व गर्भगृह या भागांमध्ये मंदिर विभागलेले आहे. बाहेर एका मंडपावर ४८ खांब आहेत, हे मंडप स्वर्गमंडप म्हणून ओळखले जाते.

या ४८ खांबांच्या आत एक वर्तुळाकार खुली जागा आहे - ही जागा होम, यज्ञ, हवन यासाठी राखून ठेवली गेली आहे, ज्यामुळे धूर बाहेर निघे. मात्र हेच प्रयोजन त्रिपुरारी पौर्णिमेला अद्भुत खगोलशास्त्रीय निमित्त ठरते.स्तंभांच्या आतील भागावर अनेक देव-देवतांची शिल्पे आहेत. या मंदिर परिसरात अनेक चित्रपटांचे चित्रीकरण झाले आहे.

मंदिराच्या शिखरापासून ते गर्भगृहापर्यंत अनेक लहान शिखरांची ओळ आहे, जी कलात्मकतेने सजवलेली आहे. खिद्रापूरला येण्यासाठी अनेक मार्ग आहेत. सांगली मार्गे किंवा गावातील स्थानिक रस्ते वापरुन या ठिकाणी पोहोचता येते. कोल्हापूर पासून केवळ ७० किलोमीटर अंतरावर हे प्रख्यात कोपेश्वर मंदिर आहे.

**- प्रवीण टाके**
**उपसंचालक (माहिती)**
**विभागीय माहिती कार्यालय,**
**कोल्हापूर**
**९७०२८५८७७७**

# दिग्गज जावेद अख्तर यांच्या हस्ते द रिदम अँड सिम्फनी वार्षिक अहवालाचे प्रकाशन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर/केतन भोज : दिग्गज कवी, गीतकार आणि पटकथा लेखक जावेद अख्तर आणि जेनेराली सेंट्रल इन्शुरन्सचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी अनुप राऊ यांच्या हस्ते आर्थिक वर्ष २०२४-२५ साठीचा वार्षिक अहवाल द रिदम अँड सिम्फनी चे प्रकाशन विक्रोळी येथील ताज लँड येथे करण्यात आले.



संगीत या काळाच्या पलीकडील सार्वत्रिक भाषेला अभिवादन म्हणून तयार करण्यात आलेल्या या विशेष अहवालात के.एल. सैगल, द बीटल्स, अरिजित सिंग ते टेलर स्विफ्ट अशा जगप्रसिद्ध ३० दिग्गज कलाकारांच्या चरित्रांचा समावेश करण्यात आला आहे. संगीताची परंपरा, तिची उत्क्रांती आणि विविध पिढ्यांना जोडणारा भावनिक दुवा यांचा अनोखा संगम या अहवालातून मांडण्यात आला.

या प्रकाशनावेळी बोलताना जावेद अख्तर म्हणाले, संगीत ही मानवजातीची सामायिक भाषा आहे. काळ बदलला, शैली बदलल्या; पण सुरांची जादू आजही तितकीच जिवंत आहे.

# मुंबई मधील उच्च न्यायालयाच्या नवीन संकुला करिता निधी कमी पडू देणार नाही : उपमुख्यमंत्री अजितदादा पवार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/विजय घनघाव : मुंबईतील वांद्रे (पू.) येथे नव्या उच्च न्यायालय संकुलाच्या भूमिपूजनाचा ऐतिहासिक सोहळा आज उत्साहात पार पडला. भारताचे सरन्यायाधीश मा.न्या. भूषण गवई जी यांच्या शुभहस्ते या संकुलाचं भूमिपूजन करण्यात आलं. या प्रसंगी मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस आणि उपमुख्यमंत्री श्री. एकनाथजी शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजितदादा पवार उपस्थित होते

आजचा दिवस महाराष्ट्राच्या न्यायव्यवस्थेसाठी अत्यंत अभिमानाचा आहे. न्यायालयाचं विकेंद्रीकरण हा आपल्या देशासाठी अत्यंत महत्त्वाचा मुद्दा आहे. महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत असलेला न्याय सर्वांसाठी उपलब्ध व्हावा हा विचार आज प्रत्यक्षात उतरतो आहे, याचा मला आनंद आहे, अशा भावना उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी व्यक्त केल्या आहेत.

मुंबई उच्च न्यायालयाचा इतिहास अत्यंत समृद्ध आहे. आता वांद्रे (पू.) येथे उभारण्यात येणाऱ्या या नव्या वास्तूमुळे न्यायदान व्यवस्था अधिक सक्षम व कार्यक्षम होईल. राज्य सरकारकडून या प्रकल्पासाठी १५ एकर जागा आधीच उपलब्ध करून देण्यात आली आहे. आणखी १५ एकर जागा मार्च अखेरपर्यंत देण्यात येईल. या प्रकल्पासाठी ज्यांनी अथक परिश्रम घेतले, त्या सर्वांचं मी मनापासून अभिनंदन करतो, असे उदगार अजितदादा यांनी व्यक्त केले आहेत.



महाराष्ट्राचा अर्थमंत्री म्हणून या कामासाठी निधीची कमतरता पडू देणार नाही, असा शब्द या विशेष कार्यक्रमाच्या निमित्तानं मी देतो. न्यायव्यवस्थेच्या सक्षमीकरणासाठी आणि जनतेच्या न्यायहक्कासाठी आपलं सरकार सदैव कटिबद्ध आहे, अशा प्रकारच्या भूमिका उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी मांडल्या आहेत.

# किसान क्रेडिट कार्डधारकांना राज्य शासनाकडून ४ टक्के व्याज सवलत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्रातील मच्छिमार व मत्स्यव्यवसायाशी संबंधित घटकांसाठी राज्य शासनाने दिलासा देणारा निर्णय घेतला आहे. शासनाने घोषित केलेल्या नव्या योजनेअंतर्गत किसान क्रेडिट कार्डधारक मच्छिमार, मत्स्यकास्तकार, मत्स्यउत्पादक, मत्स्यव्यवस्थापन करणारे तसेच मत्स्यबीज संवर्धक यांना ₹२ लाखांपर्यंतच्या अल्पमुदतीच्या खेळत्या भांडवली कर्जावर ४ टक्के व्याज परतावा सवलत देण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. या निर्णयामुळे राज्यातील सागरी व अंतर्गत जलाशयांतील हजारो मच्छिमारांना आर्थिक दिलासा मिळणार असून, मत्स्यव्यवसाय अधिक सक्षम होण्यास मदत होणार आहे.

### मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांच्या पाठपुराव्यास यश

मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी या निर्णयासाठी विशेष पाठपुरावा केला.

**योजनेचा उद्देश**

मत्स्यव्यवसायाशी संबंधित क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या घटकांना त्यांच्या व्यवसायासाठी लागणारे खेळते भांडवली कर्ज सहज उपलब्ध व्हावे आणि त्यावरील व्याजाचा भार कमी व्हावा, हा या योजनेमागील मुख्य उद्देश आहे. राज्य शासनाने या माध्यमातून मच्छिमारांना स्थिर आर्थिक आधार देऊन त्यांची उत्पादनक्षमता वाढविण्याचे लक्ष्य ठेवले आहे.

**कोणाला मिळणार लाभ?**

मच्छिमार (केवासीधारक असणे आवश्यक), मत्स्यकास्तकार, मत्स्यउत्पादक, मत्स्यव्यवस्थापन व मत्स्यबीज



संवर्धक, पोस्ट हार्वेस्टिंग क्षेत्रातील वर्गीकरण, प्रतवारी, आवेष्ठन व साठवणूक करणारे व्यावसायिक. या सर्व घटकांना बँकांमार्फत ₹२.० लाखांपर्यंतचे खेळते भांडवली कर्ज मिळेल. या कर्जावर राज्य शासनाकडून ४% व्याज परतावा सवलत दिली जाईल.

लाभार्थ्याने कर्ज उचल केलेल्या तारखेपासून एक वर्षाच्या आत पूर्ण परतफेड करणे आवश्यक राहील. ही अट पूर्ण केल्यासच त्यांना व्याज परतावा सवलत मिळणार आहे.

**अर्ज व अंमलबजावणी प्रक्रिया**

लाभार्थ्याचा अर्ज संबंधित बँकेमार्फत जिल्हा उपनिबंधक (सहकारी संस्था) यांचेकडे सादर केला जाईल. कर्ज मंजुरी व वितरणाची कार्यवाही राष्ट्रीयकृत, खाजगी, ग्रामीण तसेच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांकडून केली जाईल. जिल्हा स्तरावर अंमलबजावणीदरम्यान येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी सहायक आयुक्त (मत्स्यव्यवसाय) आणि जिल्हा उपनिबंधक/सहायक निबंधक (सहकारी संस्था) यांच्यात समन्वय साधला जाईल.

मत्स्यव्यवसाय हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा अविभाज्य भाग असून, हवामानातील अनिश्चितता, इंधन दरवाढ आणि बाजारातील स्पर्धेमुळे मच्छिमारांवर आर्थिक ताण वाढला आहे. अशा पार्श्वभूमिवर या निर्णयामुळे मच्छिमारांना आर्थिक आधार मिळेल.

# गौरविलेल्या सरपंचांच्या गावांमध्ये स्मार्ट अंगणवाड्यांची उभारणी : मंत्री आदिती तटकरे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील अंगणवाड्यांना आधुनिक, सशक्त आणि पारदर्शक बनवून बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी स्मार्ट अंगणवाडी योजनेअंतर्गत राज्यभरात व्यापक कार्यवाही सुरू आहे. या योजनेअंतर्गत उत्कृष्ट सरपंच म्हणून गौरविण्यात आलेल्या १३ सरपंचांच्या गावांमध्ये स्मार्ट अंगणवाड्या उभारण्यात आल्या असल्याचे महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले.

महिला बालविकास मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, १३ गावांतील अंगणवाड्यांना




स्मार्ट स्वरूप देण्यात आले आहे. या केंद्रांमध्ये अत्याधुनिक सुविधा, डिजीटल शिक्षण साधने, तसेच बालक आणि मातांसाठी आरोग्य व पोषण जनजागृती उपक्रम सुरू करण्यात आले आहेत. हे काम पूर्ण झाल्याचा मनस्वी आनंद आहे. एकात्मिक बालविकास सेवा (आयसीडीएस) योजनेअंतर्गत अंगणवाड्यांमध्ये बालकांना आरोग्य, पोषण आणि पूर्व-प्राथमिक शिक्षण या तिन्ही क्षेत्रांत मूलभूत सेवा पुरविल्या जातात. या अंगणवाड्यांना स्मार्ट बनविण्याच्या उपक्रमामुळे त्यांच्या पायाभूत सोयी-सुविधांमध्ये सुधारणा झाली असून, शिक्षण आणि पोषण सेवा अधिक प्रभावी पद्धतीने दिल्या जात आहेत.

मंत्री तटकरे यांनी म्हणाल्या की, स्मार्ट अंगणवाडी हे केवळ इमारतीचे नव्हे, तर बालक आणि मातांच्या उज्ज्वल भविष्याचे प्रतीक आहे. आधुनिक तंत्रज्ञान आणि संवेदनशील दृष्टिकोन यांचा संगम घडवून अंगणवाड्यांना आदर्श केंद्र बनवण्याचा प्रयत्न आहे. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील बालकांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळणार असून, राज्यातील सर्व अंगणवाड्यांना टप्प्याटप्प्याने स्मार्ट स्वरूप देण्यासंदर्भात कार्यवाही सुरू असल्याचेही तटकरे यांनी सांगितले.

**माविमच्या 'नवतेजस्विनी गारमेंट युनिट'च्या माध्यमातून महिलांना रोजगाराच्या संधी - महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे**

महिलांना स्थानिक जागी रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी रोहा येथे नवतेजस्विनी गारमेंट युनीटचे लोकार्पण करण्यात येत आहे. यामुळे महिला सक्षमीकरणाच्या दिशेने सुरू असलेली वाटचाल अधिक बळकट होण्यास सहाय्य लाभणार आहे. महिला आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून सुरू होणाऱ्या या नवउद्योगात सहभागी होणाऱ्या महिलांना आर्थिक स्वातंत्र्य प्राप्त होणार असल्याचा विश्वास महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी व्यक्त केला.

महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) निर्मित 'नवतेजस्विनी गारमेंट युनिट'चे लोकार्पण नुकतेच रोहा (रा.) येथे महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आमदार अनिकेत तटकरे, महाव्यवस्थापक महेंद्र गमरे, प्रसिद्ध अभिनेत्री किशोरी शहाणे, माविम अधिकारी, पंचायत समिती सदस्य, उमेद व नगरपरिषद प्रतिनिधी, महिला बचत गटातील सदस्य तसेच नागरिक उपस्थित होते. मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, या उपक्रमामुळे रोहा तालुक्यातील महिलांच्या स्वावलंबनाच्या दिशेने एक नवा अध्याय सुरू झाला आहे. महिलांचे प्रशिक्षण, स्थानिक भागातच कायमस्वरूपी रोजगार उपलब्ध होणार असल्याने आता महिला आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करीत असल्याचा आनंद आहे.

# श्री माणकेश्वर वाचनालयाची १०६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड शहर व परिसराची वाचन संस्कृती जोपासणारे आणि अनेक पिढ्यांची सांस्कृतिक आणि वैचारिक जडण घडण करणारे तसेच केंद्र सरकारचा राजाराम मोहन रॉय पुरस्कार प्राप्त श्री माणकेश्वर वाचनालयाची १०६ वीवार्षिकसर्वसाधारणसभावाचनालयाच्यासभागृहात वाचनालयाचे अध्यक्ष मधुकरराव शेलार यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली,

यावेळी छत्रपती शिवाजी महाराज,न्या.महादेव गोविंद रानडे यांच्या पुतळ्यास व वाचनालयाच्या संस्थापकांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून प्रतिमापूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी वाचनालयाच्या वतीने दिला जाणारा उत्कृष्ट वाचक पुरस्कार अश्विनी बर्वे यांना ट्रॉपी, शाल, पुष्पगुच्छ देऊन देण्यात आला,यावेळी संचालक डॉ. महेश बनकर यांनी वाचनालयास धार्मिक पुस्तके भेट दिली.

सभेत वार्षिक अहवालास मंजुरी,ताळेबंद व नफा तोटा पत्रक,ऑडिट मेमो व अंदाज पत्रक,ऑडिटर नेमणूक व ऐनवेळाचे विषयांना सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

यावेळी संजय घुमरे, दिलीप कुंभार्डे,सुनील सोनवणे, ड. केशव खैरे, गिरीश पाथरकर , बाळासाहेब रंधवे, वसंत कापसे आदी सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे अध्यक्ष मधुकरराव शेलार, चिटणीस बाळासाहेब कापसे यांनी दिली.

याप्रसंगी निफाड नगरपंचायतीच्या पाणीपुरवठा समितीच्या सभापतीपदी साहेबराव बर्डे,शिक्षण सभापतीपदी संदीप जेऊघाले,धन्वंतरी पुरस्कार विजेते डॉ.उत्तम डेर्ले यांसह सीमा भांडारकर,माजी नगरसेवक देवदत्त कापसे, दिलीप कापसे,चेअरमन सुरेश धारराव,रफिक शेख आदींचा सत्कार करण्यात आला.

यावेळी जेष्ठ नेते शिवाजीराव ढेपले, गुलाब टकले, शामराव शिंदे, सूरज कुंदे,संजय गाजरे,विजय धारराव, सुनील कुमावत,शाम गोळे,डॉ प्रतीक बाफना,दीपक गाजरे,संजय बोरगुडे,कैलास धारराव, प्रकाश अडसरे, शामराव शिंदे, राजेश लोखंडे, अशोक पगारे, दीपक आहेर, विठ्ठल शेळके, सुकदेव कर्वे, ॲड प्रमोद आहेर, फिरोज इनामदार, विलास वडघुले , नारायण भांडारकर, रोहिणी शेळके, संदेश गडकरी, नारायण लोखंडे, विशाल शेलार, दीपक गाजरे आदिंसह वाचनालयाचे अध्यक्ष मधुकरराव




शेलार, उपाध्यक्षा मेघा जंगम, चिटणीस बाळासाहेब कापसे, सहचिटणीस राहूल दवते, संचालक ॲड प्रवीण ठाकरे, तन्वीर राजे,सुहास सुरळीकर,ग्रंथमित्र नईमखान पठाण,नीलकंठ कुंदे, बाळासाहेब कर्डिले, सुजाता तनपूरे,डॉ. महेश बनकर,कवी राजेंद्र सोमवंशी, राजेंद्र खालकर, सुनिल चिखले,प्र ग्रंथपाल नितीन बनसोडे, कर्मचारी नंदकुमार पुंड, अनिता इस्ते आदी उपस्थित होते. सभेचे प्रास्तविक अध्यक्ष मधुकरराव शेलार, अहवाल वाचन चिटणीस बाळासाहेब कापसे, सूत्रसंचालन सुहास सुरळीकर तर आभार राजेंद्र सोमवंशी यांनी मानले

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# "तयार हैं हम!" म्हणणाऱ्या इच्छुक उमेदवाराची धावपळ, तिकिटावर मात्र अजूनही संभ्रम

## उमेदवाराची शाश्वती नसल्याने अनेकांची चेहरे अजूनही संभ्रमात; वेट ॲण्ड वॉचच्या भूमिकेत इच्छुक उमेदवार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर नगरपालिकेच्या आगामी निवडणुकीचा बिगुल वाजल्यामुळे मुळे राजकीय वातावरण तापले आहे. प्रभागणिक सुरू झालेल्या इच्छुक उमेदवारांची धावपळ आणि तयार हे हम म्हणत केलेली जनसंपर्क मोहीम यामुळे पंढरपूर राजकीय दृष्ट्या गजबजले आहे. मात्र उमेदवाराची शाश्वती नसल्याने अनेकांची चेहरे अजूनही संभ्रमात दिसत आहेत.



या निवडणुकीत महाविकास आघाडी विरुद्ध महायुती असा रंगतदार सामना रंगणार आहे भाजप, शिंदे शिवसेना गट ठाकरे सेना अजित पवार गट राष्ट्रवादी शरद पवार गटाची राष्ट्रवादी अनेक काँग्रेस असे सात प्रमुख गट थेट आमने-सामने येणार आहेत प्रत्येक पक्षाने जिंकण्यासाठी आपली सर्व ताकद पणाला लावली आहे.

**घोषित प्रचाराला जोर दिवाळीच्या शुभेच्छा च्या निमित्ताने जनसंपर्क**

प्रभाग रचना अंतिम झालेल्या आता प्रत्येक प्रभागात उमेदवारांचे हालचाल वाढले आहे. उमेदवार अघोषित प्रचारात बोलले आहेत सामाजिक उपक्रम उद्घाटन समारंभ आणि वाढदिवसाच्या कार्यक्रमातून मतदारात पर्यंत पोहोचण्याचे प्रयत्न जोमात सुरू आहेत.

राजकीय रणनीतीकारांनी ही प्रभागावर आणि ते मांडत विरोधकांच्या हालचालीवर लक्ष केंद्रित केले आहे. कोणत्या प्रभागात कोणाला उतरवायचे कोण कोणाच्या विरोधात उभी राहणार यावर पक्षांतर्गत चर्चेला उधाण आले आहे.

तिकीट नक्की मिळेल या विश्वासात राजकीय समीकरणाची चढाओढ आहे.

अनेक इच्छुक उमेदवारांना आपल्याला तिकीट मिळणार असा विश्वास असला तरी पक्ष स्थितीचा निर्णय त्यांच्या अपेक्षाप्रमाणे येईलच याची खात्री नाही. त्यामुळे तिकीट मिळो वा न मिळो मतदार संघ आपलाच या भावनेने अनेकांनी जनतेत वावरण्यास सुरुवात केली आहे.

दरम्यान काही ठिकाणी मागील कार्यकाळातील नगरसेवकांचे प्रतिस्पर्धी सक्रिय झाल्यास असून यावेळी मीच उमेदवार असा संदेश देत मैदानात उतरले आहेत त्यामुळे प्रत्येक पक्षात आतली धुरळेबाजी सुरू झाली आहे.

**१० ऑक्टोंबर पासून अर्ज दाखल प्रक्रिया, राजकीय रंगत शिगेला.**

नगरपालिका निवडणुकीचे रणधुमाळी सुरू झाली असून १० ऑक्टोबर पासून उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होणार आहे. त्याआधीच सर्व राजकीय पक्ष आणि त्यांच्या गोटातील पुढारी क्शन मोडवर आले असून आहेत पुन्हा एकदा सत्तेवर झेंडा फडकवण्यासाठी सर्वच पक्षाची धडपड सुरू आहे.

दरम्यान गेल्या काही वर्षापासून नगरपालिकेवर प्रशासक राज् असल्याने कार्यकर्ते राजकीय संधीचा प्रतीक्षेत होती, आता निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्याने पंढरपुरातील प्रत्येक गल्ली, चौक, आणि वार्डातील निवडणुकीचा चाहूल लागली आहे

तयार है हम-पण तिकिटावर भविष्य अवलंबून.

एकीकडे उमेदवार जनतेत आपली उपस्थिती दाखवत आहेत. तर दुसरीकडे पक्षाच्या उमेदवारीसाठी प्रयत्नाची पराकाष्टा करत आहेत. त्यामुळे राजकीय समीकरणाचा खेळ अधिकच रंगत चाललेला आहे. निवडणुकीसाठी आम्ही तयार आहोत आता फक्त पक्षाचा निर्णय बाकी आहे,असे मतदारांना सांगणारे आणि इच्छुक उमेदवार आपल्या मतदारसंघात जोमाने वावरताना दिसत आहेत. थोडक्यात पंढरपूरची निवडणूक म्हणजे केवळ सत्ता मिळवण्याची लढाई नाही तर तिकिटाची खात्री आणि जनतेचा विश्वास यामधली खरी कसोटी ठरणार आहे.

---

# सोलापूरच्या असंघटित कामगारांच्या ३० हजार घरांचा मार्ग मोकळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



सोलापूर (प्रतिनिधी) : सोलापूर येथील असंघटित कामगारांसाठी प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत मौजे कुंभारी (ता. दक्षिण सोलापूर) येथे उभारण्यात येणाऱ्या ३० हजार घरांच्या प्रकल्पाला राज्य शासनाची दिलासादायक मंजुरी मिळाली आहे. या प्रकल्पासाठी अनर्जित, नजराणा रक्कमेसह अकृषिक वापर शुल्कातून सूट देण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत मौजे कुंभारी येथील दक्षिण सोलापूर येथील रे नगर फेडरेशन आणि संलग्न गृहनिर्माण संस्थांना एकूण २१ हे. आर. ६२ इतकी जमीन शासनाने गृहनिर्माण प्रकल्पासाठी उपलब्ध करून दिली आहे. या जमिनींची अनर्जित रक्कम प्रति चौरस मीटर एक रूपया या नाममात्र दराने आकारण्यात येणार आहे.

या निर्णयानुसार २१ हेक्टर ६२ आर जमिनीवरील १६ कोटी ९३ लाख ८९ हजार ३०० रुपयांची अनर्जित रक्कम तसेच आठ लाख पाच हजार २२४ रुपयांची थकीत अकृषिक कर थकबाकी माफ करण्यात येणार आहे. यामुळे प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर सोलापूर शहर व परिसरातील असंघटित कामगार, मजूर, लघुउद्योग व सेवा क्षेत्रातील कुटुंबांना परवडणाऱ्या दरात घरे उपलब्ध होणार आहेत.

# औसा नगरपालिके मार्फत होणाऱ्या विकास कामाच्या नावाखाली बोगस कामाला आधार कुणाचा : अक्षय धावारे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधि/अमर जाधव : औसा नगरपालिका मार्फत शहरांत विविध विकास कामे चालू आहेत परंतू विकास कामाच्या नावाखाली बोगस काम चालू असल्याचे भिम आर्मी चे तालूका अध्यक्ष सिध्दार्थ कांबळे व त्यांच्या टीम ने नगरपालिका मुख्यधिकारी साहेब यांना दि १०/१०/ २०२५ रोजी निवेदन देऊन निदर्शनास आणून दिले होते व संबंधित इंजिनियर, तसेच गुतेदार यांच्यावर कारवाई ची मागणी केली होती एक महिना उलटला तरी अद्याप कार्यवाही झालेली नाही म्हणून दि ०३/११/२०२५ रोजी पासून भिम आर्मी भारत




एकता मिशन च्या माध्यमातून औसा नगरपालिका समोर तालुका संघटक सुनील जोगदंड हे आमरण उपोषणाला बसले आहेत या उपोषणात कडघर गल्लीतील रस्ता हा दुबारा करण्यात यावा तसेच औसा येथील आमदार अभिमन्यू पवार यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णआकृती पुतळा बसवण्यात येईल आसे आश्वासन दोन वर्षांपूर्वी दिलेले होते ते आद्याप पुर्ण झाले नसून या सर्व मागण्या तात्काळ मागण्या कराव्यात उपोषण कर्त्याच्या जिवाला काही बरे वाईट झाले तर त्याची सर्व जबाबदारी स्थानिकचे आमदार अभिमन्यू पवार इंजिनिअर गुत्तेदार व या बोगस कामामध्ये सहभागी असलेला प्रत्येक अधिकारी हा जबाबदार असेल असा इशारा या उपोषणस्थळावरून अक्षय धावारे यांनी दिला या वेळी मागण्यासाठी भिम आर्मी मराठवाडा निरीक्षक अक्षय धावारे जिल्हा अध्यक्ष विलास चक्रे जिल्हा कार्याध्यक्ष बबलू गवळे जिल्हा संघटक सोनू घोडके , भिम आर्मी जिल्हा संघटक समाधान कांबळे तालुका अध्यक्ष सिद्धार्थ कांबळे शहर अध्यक्ष मुज्जू शेख,भिम आर्मी खरोसा सरखाल प्रमुख प्रकाश अवचारे वंचितचे तालुका अध्यक्ष शिवाजी कुंभार, वंचित शहर अध्यक्ष सद्दाम पठाण शहर महासचिव वंचित इलीयस चौधरी मोतीराम मामा कांबळे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

---



# देऊळगाव राजा नगरपरिषदेच्या अध्यक्षपदाच्या रिंगणात 'चंद्रकांत खरात'

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे /बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : देऊळगाव राजा: नगरपरिषदेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत यावेळी एक उत्सुकतापूर्ण आणि आशादायक चित्र पाहायला मिळत आहे. या रिंगणात उतरला आहे एक नवा, ऊर्जेने सळसळणारा तरुण चेहरा - सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत खरात! त्यांच्या नावाभोवती एक वलय निर्माण झाले आहे, आणि याचे मुख्य कारण म्हणजे त्यांनी आतापर्यंत समाजात केलेले अविरत आणि धडाकेबाज सामाजिक कार्य.

**'समाजकार्याचा करिश्मा' - तरुणाईचा फायदा**

चंद्रकांत खरात यांच्या उमेदवारीला सर्वात मोठी जमेची बाजू आहे, ती म्हणजे त्यांचे सामाजिक कार्य आणि तरुणांमधील त्यांची लोकप्रियता. अगदी कमी वयात त्यांनी प्रशासनातील भ्रष्टाचारावर अंकुश ठेवण्याचे जे प्रयत्न केले, ते वाखाणण्याजोगे आहेत. यामुळे त्यांची प्रशासनावर चांगली पकड असल्याचे दिसून येते, जी शहराच्या विकासासाठी निर्णायक ठरू शकते.

**चंद्रकांत खरात यांचे व्हिजन - 'सलोखा आणि सुविधा'**

सामाजिक सलोखा: शहरात सर्व धर्मीय आणि जातीय घटकांमध्ये सलोखा आणि एकोपा टिकवून ठेवणे, हे त्यांच्या व्हिजनचे केंद्रस्थान आहे.

प्रशासकीय पारदर्शकता: भ्रष्टाचाराविरुद्ध कठोर भूमिका घेऊन, प्रशासनात पारदर्शकता आणणे.

सुविधांचा अग्रक्रम: शहरातील प्रत्येक नागरिकाला मूलभूत सुविधा मिळाव्यात यासाठी सक्रिय कार्य करणे.

**रोडमॅप तयार: 'विकसित देऊळगाव राजा' संकल्पना**

देऊळगाव राजा हे शिक्षण आणि धार्मिक अध्यापनाचे महत्त्वाचे केंद्र असून, ते झपाट्याने वाढणारे शहर बनले आहे. या वाढत्या शहराच्या गरजा लक्षात घेऊन चंद्रकांत खरात यांनी विविध समाज घटकांसाठी सविस्तर रोडमॅप तयार केला आहे:

शहर विकास व सुविधा पाण्याच्या समस्या, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, नाल्यांची दुरुस्ती, वीज पुरवठा यांसारखे मूलभूत अडथळे दूर करणे. नागरिकांवर लागणारा अतिरिक्त कर कमी करण्याचा प्रयत्न करणे.

शिक्षण आणि तरुणाई बेरोजगार तरुणांसाठी मार्गदर्शन केंद्रे सुरू करणे. तरुण-तरुणींच्या शैक्षणिक प्रगतीसाठी आवश्यक ती सुविधा उपलब्ध करून देणे.

व्यापारी आणि कामगार व्यापाऱ्यांसाठी अनुकूल वातावरण निर्माण करणे, शेतकरी, मजूर आणि नोकरदार वर्गाच्या समस्या सोडवणे.

महिला सक्षमीकरण । महिला बचत गट आणि कामगार महिलांसाठी विशेष योजना आखून त्यांना शहराच्या विकासात सक्रिय सहभागी करून घेणे.

चंद्रकांत खरात यांच्या रूपाने देऊळगाव राजाच्या नागरिकांना एका सक्षम, सक्रिय आणि व्हिजनरी नेतृत्वाची संधी मिळत आहे. त्यांचे सामाजिक कार्याचे अनुभव आणि प्रशासनावर अंकुश ठेवण्याची क्षमता, या शहराला नव्या उंचीवर घेऊन जाण्याची शक्यता आहे. या तरुण तुर्काची ही धडाकेबाज एंट्री, देऊळगाव राजाच्या राजकारणाला आणि समाजकारणाला निश्चितच एक नवी दिशा देईल!

---

## सहकार मंत्री मा. नामदार बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते प्रदान...

# पंढरपूर अर्बन बँक नवराष्ट्र सहकार पुरस्काराने सन्मानित...

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सोलापूर जिल्ह्याची अर्थवाहिनी व ११३ वर्षांची उज्ज्वल परंपरा लाभलेली, तसेच महाराष्ट्र राज्यात कार्यविस्तार असलेली दि पंढरपूर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., पंढरपूर हिला प्रतिष्ठेचा नवराष्ट्र सहकार पुरस्कार २०२५ (विशेष उल्लेखनीय कामगिरी) प्रदान करण्यात आला.

हा पुरस्कार वितरण सोहळा मुंबई येथील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे मोठ्या उत्साहात पार पडला. बँकेस हा मानाचा पुरस्कार मा. ना. श्री. बाबासाहेब पाटील, सहकार मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला.




बँकेच्या वतीने चेअरमन श्री. सतीश मुळे, संचालक श्री. हरीश ताठे, श्री. मनोज सूरवसे, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. उमेश विरधे, व व्यवस्थापक श्री. गणेश हरिदास, विशाल तपकिरे यांनी हा पुरस्कार स्वीकारला. नवराष्ट्र समूह दरवर्षी संपूर्ण महाराष्ट्रातील सहकार क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या संस्था आणि व्यक्तींना सन्मानित करतो. यावर्षीच्या या सन्मानासाठी दि पंढरपूर अर्बन को-ऑप बँकची निवड करण्यात आली आहे. या प्रसंगी बँकेचे चेअरमन श्री. सतीश मुळे म्हणाले : आमचे दैवत श्रद्धेय सुधाकरपंत परिचारक यांनी दाखवून दिलेल्या संस्कारित सहकाराच्या मार्गावर आम्ही प्रामाणिकपणे वाटचाल करत आहोत. कुटुंबप्रमुख मा. प्रशांत मालक परिचारक यांच्या मार्गदर्शनाखाली संचालक मंडळ, अधिकारी आणि सेवकवर्ग बँकेच्या प्रगतीसाठी एकदिलाने कार्यरत आहे. ग्राहकांचा विश्वास आणि सभासदांचे सहकार्य हेच आमच्या यशाचे खरे बळ आहे. हा पुरस्कार आमच्या सर्व ग्राहक, सभासद, ठेवीदार आणि हितचिंतक यांना समर्पित आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. उमेश विरधे यांनी सांगितले : सहकार क्षेत्रातील आमच्या कार्याची दखल घेऊन आम्हाला प्रोत्साहन देणाऱ्या 'नवराष्ट्र' समूहाचे आम्ही मनःपूर्वक आभार मानतो.

या दिमाखदार सोहळ्याला मा. ना. श्री. बाबासाहेब पाटील (सहकार मंत्री, महाराष्ट्र राज्य), मा. ना. श्री. संजय सावकारे (वस्त्रोद्योग मंत्री, महाराष्ट्र राज्य), आमदार प्रवीण दरेकर (अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकार फेडरेशन), आमदार विनय कोरे (अध्यक्ष, वारणा समूह), आमदार प्रसाद लाड, तसेच श्री. प्रविण दराडे (मुख्य सचिव, वस्त्रोद्योग विभाग, महाराष्ट्र राज्य) आदी मान्यवर उपस्थित होते.

# काक्रंबा जिल्हा परिषद गटातून रिपाइंचे बाबासाहेब मस्के संपूर्ण ताकदीनिशी निवडणूक लढविणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के.गायकवाड : तुळजापूर तालुक्यातील काक्रंबा जिल्हा परिषद गटातून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाचे एकनिष्ठ कार्यकर्ते बाबासाहेब मसाजी मस्के हे संपूर्ण ताकदीनिशी निवडणूक रिंगणात उतरणार असल्याचे समजते.

भारतीय दलित पँथर पासून ते आजतागायत देशाचे केंद्रीय सामाजिक न्याय व अधिकारता राज्य मंत्री तथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष नामदार रामदासजी आठवले साहेब यांच्या नेतृत्वाखाली एकनिष्ठ असुन नामदार रामदास आठवले यांचे ते निकटवर्तीय कार्यकर्ते म्हणून ओळखले जातात.

बाबासाहेब मस्के हे तुळजापूर तालुक्यातील जवळगा (मेसाई ) येथील आंबेडकर चळवळीतील जेष्ठ कार्यकर्ते तथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे जिल्हा कार्याध्यक्ष म्हणून सामाजिक,राजकीय, चळवळीत ते सर्वत्र परिचित आहेत.काक्रंबा जि.प. गट हा अनुसुचित जाती साठी राखीव असून बाबासाहेब मस्के हे या गरातून संपूर्ण ताकतिनिशी निवडणूक लढविण्याचा निर्धार पक्का केला आहे.




ते रिपब्लिकन चळवळीतील कार्यकर्ते असून नामदार रामदासजी आठवले यांच्या नेतृत्वाखाली पँथरच्या माध्यमातून त्यांनी आपल्या सामाजिक राजकीय कार्याला सुरुवात केली असून गेल्या अनेक वर्षांपासून ते तुळजापूरच नव्हे तर धाराशिव जिल्ह्यात सामाजिक कार्यकर्ते म्हणून सर्वत्र परिचित आहेत.मध्यंतरीच्या कालखंडामध्ये त्यांनी तुळजापूर तालुक्यातील सलगरा (दिवटी ) पंचायत समिती गणातून निवडणूक लढवली होती त्यावेळी त्यांना अवघ्या काही मताने पराभव पत्करावा लागला होता. त्यामुळे त्यांचा या गटात जनसंपर्क दांडगा असून सामान्य माणूस केंद्रस्थानी ठेवून ते आपले काम करतात.गोरगरीब जनतेच्या अडीअडचणीला धावून जातात. श्रावणबाळ योजना,संजय गांधी योजना,इंदिरा गांधी योजना आधी योजनेतील लाभार्थ्यांना वृद्धांना विधवा परितक्ता महिलांना शासकीय योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी त्यांचा मोठा हातखंड आहे.आतापर्यंत त्यांनी अशा गरजू अनेक लोकांना मानधन मिळवून दिलेले आहे. कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण योजनेच्या माध्यमातून भूमीहीन . दलित कुटुंबाला जमीन मिळवून देण्यासाठी ते सातत्याने प्रयत्न करतात. रिपब्लिकन पक्षाच्या माध्यमातून राबविल्या जाणाऱ्या धोरणाचा ते काटेकोरपणे पालन करतात. गोरगरिबांच्या न्याय हक्कासाठी आयोजित मोर्चे आंदोलने निदर्शने यामध्ये ते सक्रिय असतात. त्यांच्या पहाडी आवाजाने ते सर्वांचे लक्ष विशेषता शासनाचे लक्ष वेधून घेतात आणि जोपर्यंत खऱ्या अर्थाने न्याय मिळत नाही तोपर्यंत न्यायासाठी झगडणारा कार्यकर्ता म्हणून त्यांची एक ओळख आहे.

जिल्हा परिषद काक्रंबा गटामध्ये त्यांचा फार मोठा जनसंपर्क आहे.विशेषत सर्व जाती धर्मात त्यांना मानणारा वर्ग मोठा आहे त्यामुळे ते रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले)., भाजपा व मित्र पक्ष महायुतीच्या माध्यमातून या गटातून संपूर्ण ताकतीनिशी निवडणूक लढविण्याची तयारी करत आहेत.रिपाइं भाजपा व मित्र पक्षाच्या महायुतीतून त्यांना जर संधी दिली तर त्यांचा विजय निश्चित आहे असे राजकीय वर्तुळात बोलले जाते.

# संजीवन समाधी सोहळ्यासाठी श्री पांडूरंगाच्या पालखी सोहळ्याचे प्रस्थान

## प्रभारी व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत यांनी दिली माहिती; १७ नोव्हेंबर रोजी होतेय संजीवन समाधी सोहळा









**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : श्री. संत ज्ञानेश्वर संजीवन समाधी सोहळयासाठी मंदिर समितीमार्फत श्री. विठ्ठलाच्या पादुका २०१४ पासून ह.भ.प. विठ्ठल महाराज वासकर यांचे पायी दिंडी सोबत आळंदी येथे नेण्यात येतात. सदरचा पालखी सोहळा कार्तिक शुध्द ०५ ते मार्गशिर्ष शुध्द पौर्णिमा या कालावधीत आळंदी येथे जाऊन परत येत असतो. प्रतिवर्षीप्रमाणे या सोहळ्याचे दि.०५ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रस्थान झाले असल्याची माहिती प्रभारी व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत यांनी दिली.

कार्तिक शुध्द ०५ रोजी गोपाळपूर येथे गोपाळ काला होऊन सर्व संतांच्या दिंड्या मार्गस्थ झाल्या व कार्तिकी यात्रेची सांगता झाली. परंपरेनुसार श्रींच्या पालखींची नगर प्रदक्षिणा झाली. यावेळी श्रींच्या पालखीचे अबाल, वृध्द, अनाथ, दुर्बल, भाविकांनी दर्शन घेतले.

सदरचा पालखी सोहळा कार्तिक शुध्द पोर्णिमा म्हणजे दि. ०५ नोव्हेंबर रोजी श्रीक्षेत्र पंढरपूरहून प्रस्थान करून कार्तिक वद्य अष्टमी दि १२ नोव्हेंबर रोजी आळंदी येथे पोहचणार असून, त्यानंतर दुसऱ्या दिवशी इंद्रायणी स्नान, पालखी प्रदक्षिणा, द्वादशी खिरापत व दि. १७ नोव्हेंबर रोजी श्री संत ज्ञानोबाराय संजीवन समाधी सोहळा संपन्न होत आहे.

पालखी सोहळा प्रस्थानावेळी मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, सदस्य ह.भ.प.ज्ञानेश्वर देशमुख जळगांवकर, सोहळा मार्गदर्शक तथा सदस्य सल्लागार परिषद ह.भ.प. विठ्ठल महाराज वासकर, प्रभारी व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत, लेखा अधिकारी मुकेश अनेचा, विभाग प्रमुख संजय कोकीळ उपस्थित होते.

सदरचा पालखी मार्गशिर्ष शु. नवमी दि २९ नोव्हेंबर रोजी श्रीक्षेत्र पंढरपूरला परत येत आहे. या पालखी सोहळ्याच्या पायी मार्गावर आवश्यक त्या सोई सुविधा उपलब्ध करून देणेबाबत कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली संबंधित प्रशासकीय अधिकारी यांना पत्रव्यवहार करून सोई सुविधा उपलब्ध करून घेण्यात येत आहेत. याशिवाय पालखी सोहळा संपर्क प्रमुख पदी श्री मेघराज महाराज वळके पाटील (मो ०८८३०२१७३१२) नियुक्ती करून जबाबदारी देण्यात आली आहे. तसेच या पालखी सोहळ्यासोबत पौराहित्य करणारे कर्मचारी पूर्णवेळ उपस्थित राहणार असल्याचे प्रभारी व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत यांनी यावेळी सांगीतले.




# वर्षा बिराजदार व लक्ष्मी बऱ्हाणपुरे दोघींनी मिळविले टॅलेंट हंट स्पर्धेत उज्वल यश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी :जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा बोरी उमरगे येथील इयत्ता सातवीच्या वर्गातील विद्यार्थिनी वर्षा राजकुमार बिराजदार हिने टॅलेंट हंट (व्यक्तिमत्व विकास स्पर्धा ) स्पर्धेमध्ये केंद्रस्तरावर कथाकथन या स्पर्धेत द्वितीय क्रमांक प्राप्त केला. तसेच लक्ष्मी सिद्धाराम बऱ्हाणपुरे हिने निबंध स्पर्धेत द्वितीय क्रमांक प्राप्त केला . दोघींनाही वर्ग शिक्षिका श्रीमती रिंकु जाधवर मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले.

दरवर्षीप्रमाणे प्रशासकीय आदेशान्वये विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी त्यांचा व्यक्तिमत्व विकास घडवण्यासाठी या स्पर्धांचे आयोजन केले जाते .दिनांक ४ नोव्हेंबर २०२५ रोजी मैंदर्गी येथे केंद्रस्तरावर या स्पर्धांचे आयोजन केले होते. उमरगे मराठी शाळेच्या या दोन्ही विद्यार्थिनींनी उज्वल यश प्राप्त केले. पालक वर्गातून त्यांचे कौतुक केले जात आहे. त्यांना पुढील तालुकास्तरीय स्पर्धेसाठी खूप खूप शुभेच्छा .यावेळी शिक्षण विस्तार अधिकारी स्वामी साहेब, केंद्रप्रमुख पाटील सर, शिक्षक वृंद व विद्यार्थी उपस्थित होते.



# दि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनियर्स सोलापूरची वार्षिक सोळावी सर्वसाधारण सभा उत्साहात संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर प्रतिनिधी/नागेश श्रीचिप्पा : दि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनियर्स सोलापूर शाखेची सोळावी सर्वसाधारण सभा शासकीय तंत्रनिकेतन सोलापूर येथील विश्वेश्वरय्या सभागृहात उत्साहात पार पडली. सर्वसाधारण सभेचे उद्घाटन विद्यमान व माजी चेअरमन व सेक्रेटरी यांच्या उपस्थितीत सर विश्वेश्वरय्या यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पून व दीपप्रज्वलनाने करण्यात आले. सभेच्या सुरुवातीला देशातील ज्या अभियंत्यांनी आपले जीवन समर्पित केले अशा सर्व दिवंगत अभियंत्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. सोलापूर सेंटरचे अध्यक्ष इंजि. डॉ. मोहन देशपांडे यांनी प्रास्ताविक करून मागील दोन वर्षातील राबविलेल्या उपक्रमांचा अहवाल सादर केला. बोर्ड ऑफ स्कुटीनर्स चे अध्यक्ष डॉ. मगदूम यांनी नवीन पदाधिकारी यांची निवड जाहीर केली. इंजि. डॉ. प्रशांत पवार, इंजि. मनोज ढोबळे, इंजि. दीप्ती तांबोळी, इंजि. रोहन देशमुख, इंजि. पद्मावती नागणसुरे, इंजि. डॉ. मीनाक्षी पवार, इंजि. डॉ. नरेंद्र काटीकर, इंजि. डॉ. प्रवीण ढवळे, इंजि. विनील कोंगारी, इंजि. शशिकांत गोसावी, इंजि. चेतन कोनापुरे, इंजि. संजय बुगडे यांची २०२५-२७ या कालावधीसाठी निवड झाली. प्रमुख उपस्थितांपैकी शासकीय तंत्रनिकेतनचे समन्वयक इंजि. डॉ. नरोटे, नूतन चेअरमन इंजि. डॉ. श्रीकांत जोशी, नूतन सेक्रेटरी इंजि. ओम दरक, यांचा तसेच माजी व नवनिर्वाचित सदस्यांचा सन्मानचिन्ह देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. सहसचिव तथा नूतन चेअरमन इंजि. डॉ. श्रीकांत जोशी यांनी आर्थिक वर्ष २०२४ २५ चा ताळेबंद सादर केला व पुढील कालावधीसाठीच्या नियोजित आराखड्याबद्दल विस्तृत माहिती दिली.

नूतन सचिव इंजि. ओम दरक यांनी सदस्यांना सक्रिय सहभागाचे आवाहन करून सर्व उपस्थितांचे आभार मानले. सभेच्या यशस्वीतेसाठी संस्थापक अध्यक्ष सोमाणी, माजी अध्यक्ष डॉ. जी. के. देशमुख, डॉ. बी. पी. रोंगे, सी बी नाडगौडा, डॉ. एस. एस. पाटील, प्राचार्य एस. एम. शेख, गव्हर्नमेंट पॉलीटेक्निकचे समन्वयक डॉ. नरोटे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# विठू माऊलीच्या गजरामध्ये बोपगाव येथे काकड आरती सांगता

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर प्रतिनिधी/डॉ. विनायक गायकवाड : पुरंदर :: उठा पांडुरंगा आता दर्शन द्या. उठा सकळ जन उठले नारायण. संपूर्ण महाराष्ट्र मध्ये विशेषता शुक्ल एकादशी कार्तिक महिना ते त्रिपुरी पौर्णिमा कार्तिक महिना या कालावधीमध्ये बहुतांश विठ्ठल मंदिरातून पहाटेच्या वेळी काकड आरती केली जाते.



त्याचप्रमाणे पुरंदर तालुक्यातील बोपगाव मध्ये ही संत ज्ञानेश्वर भजनी मंडळ बोपगाव व सर्व सहकारी समस्त ग्राम स्थ, महिला, पुरुष, नित्यनेमाने भल्या पहाटे काकड आरतीला उपस्थिती दाखवतात. संत एकनाथ हाराज व संत तुकाराम महाराज यांच्या आरत्या, अभंग, भजन, गवळणी, भल्या पहाटे सुमधुर आवाजने गावाचा संपूर्ण परिसर भक्तीमय होतो. स्वतःच्या आईंदी, आळशी, आणि चैनी, वृत्तीला काकड्याच्या रूपाने जाळून टाकणे ही त्या मागची भावना आहे असे मानले जाते.

त्रिपुरा पौर्णिमेच्या पहाटे संत ज्ञानेश्वर भजनी मंडळ ग्रामस्थ महिला भगिनी यांनी गावांमधून दिंडी काढून विठ्ठल नामाच्या गजरामध्ये काकड आरतीची सांगता केली. गेली पंधरा दिवस ह भ प अनिल म हाराज घिसरे, बाळासाहेब फडतरे सर, सुनील महाराज फडतरे, शिवाजी आबा जगदाळे, सुनील आण्णा फडतरे, पुरोहित प्रशांत गुरव, माऊली कदम, मस्कु दादा फडतरे, गणेश आबा फडतरे,काशिनाथ भाऊ फडतरे, अतुल महाराज फडतरे, ज्ञानेश्वर बापू फडतरे, लक्ष्मण काशिनाथ फडतरे, गोपाळ नाना जगदाळे,सेवा निवृत्त पोलीस अधिकारी अशोक जगदाळे, विठ्ठल आप्पा फडतरे,नामदेव बयाजी फडतरे,विठ्ठल यशवंत फडतरे,बाळू अनंता फडतरे, नारायण निवृत्ती फडतरे, काळू नाना पवार,नामदेव यादव फडतरे,तसेच महिला भजनी मंडळ या सर्वांनी रोज पहाटे सुंदर अशी भक्ती मय सेवा केली. सर्व भजनी मंडळाचा यावेळी बोपगावच्या विध्यमान सरपंच सौ सारिका गुरव व इतर मान्यवरांचे हस्ते सन्मान केला नंतर महाप्रसादाने काकड आरतीची सांगता झाली.

# अंजली मगर ,अंकिता काकडे व श्रेया मिटकरी यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधी/अमर जाधव : औसा तालुक्यातील दापेगाव येथील इमॅन्युएल पब्लिक स्कूलच्या विद्यार्थीनीं अंजली दिनकर मगर व अंकिता महेश काकडे सह श्रेया मिटकरी या तीन विद्यार्थीनींनी शालेय क्रीडा स्पर्धेत लातूर येथील क्रिडा संकुलात झालेल्या विभागीय स्पर्धेत चमकदार कामगिरी करून दाखवली. या तिन्ही विद्यार्थीनींनी विभागीय स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. त्यामुळे या तीन्ही विद्यार्थीनींची आता रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण येथे १२ व १३ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.



दापेगाव येथील इमॅन्युएल पब्लिक स्कूलच्या चार विद्यार्थ्यांनी या विभागीय स्पर्धेत भाग घेतला होता. विभागीय स्पर्धेत अंजली दिनकर मगर या ७ वी वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थीनींने उंच उडी (हाय जंप) मध्ये १.२० उडी मारुन विभागीय स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला तर आता राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. तर अंकिता महेश काकडे या विद्यार्थिनीने १०० मीटर धावणे विभागीय स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. अंजली मगर व अंकिता काकडे सह श्रेया मीटकरी उंच उडीत या तिन्ही विद्यार्थीनींची रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

या तीन्ही यशस्वी विद्यार्थीनींचे शाळेच्या प्राचार्या किर्ती पाटील व क्रिडा शिक्षक बालाजी सूर्यवंशी, सह सरपंच मारुती पांडुळे, उपसरपंच गनेश लिंबाळकर, माजी सरपंच सुरेश सोनटक्के, विशाल कदम आनंद पांचाळ, दगडू मगर दीपक दळवे, राजेंद्र बोरफळे संभाजी सोनटक्के, नामदेव लिंबाळकर, रामकिसन सोनटक्के अभिषेक लिंबाळकर, विकास मगर, गोपाळ सुरवसे, संभाजी मगर, महेश शिंदे, सह सिद्धेश्वर प्रा,शाळा औसा येथील सर्व शिक्षकांनी अभिनंदन करुन शुभेच्छा दील्या

# साप, वाशेरे, आमणे, सावद रस्त्यावरील खड्ड्यांमुळे नागरिक त्रस्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील सापे, वाशेरे, आमणे आणि सावद मार्गे कल्याणकडे जाणाऱ्या रस्त्यांची काही ठिकाणी अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे. ठिकठिकाणी पडलेल्या मोठमोठ्या खड्ड्यांमुळे प्रवाशांचा जीव धोक्यात आला असून वाहनचालकांना दररोज तारेवरची कसरत करावी लागत आहे. अवकाळी पावसामुळे या खड्ड्यांमध्ये पाणी साचून अपघातांचा धोका अधिक वाढला आहे. स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली असून, प्रशासनाकडून केवळ खडीची मलमपट्टी करून तात्पुरती उपाययोजना केली जाते, असा आरोप होत आहे. कल्याण-पडघा मार्गावरील सापे, वाशेरे, आमणे व सावाद परिसरात खड्ड्यांचे साम्राज्य पसरले आहे. आमणे येथे खड्डे पडलेल्या रस्त्याच्या शंभर मीटर अंतरावरच समृद्धी महामार्ग आहे. त्यामुळे महामार्गावर जाणाऱ्या नागरिकांना याच रस्त्याचा वापर करावा लागतो. सध्या समृद्धी महामार्गावर प्रवासासाठी वाहनांची संख्या वाढल्याने या दुय्यम रस्त्यावर वाहतुकीचा ताण प्रचंड वाढला आहे. परिणामी खड्ड्यांमुळे वाहनांची नासधूस, कमरे-मानेचे आजार आणि प्रवासातील त्रास नागरिकांना भेडसावत आहे. याशिवाय सापे, वाशेरे, आमणे ,सावद व बापगाव परिसरात अनेक औद्योगिक गोदामे असल्याने दिवसरात्र ट्रक, कंटेनर व जड वाहनांची सतत वर्दळ असते.

खड्ड्यांमुळे ही वाहने वारंवार बंद पडतात आणि वाहतूक कोंडीचे चित्र नेहमी दिसून येते. त्यामुळे विद्यार्थ्यांना शाळा-कॉलेजला जाताना, तसेच रुग्णांना दवाखान्यात नेण्यात मोठा त्रास सहन करावा लागत आहे.फक्त मलमपट्टी नव्हे ,तर खड्डे कायम स्वरूपी कधी बुजवले जाणार? असा संतप्त सवाल नागरिकांकडून होत आहे.

> **काही दिवसांपूर्वीच खड्डे भरले होते. मात्र अवकाळी पावसामुळे पुन्हा खड्डे पडले असून, लवकरच दुरुस्तीचे काम करण्यात येईल.**
> **-दत्तु गीते (भिवंडी सार्वजनिक बांधकाम विभाग उपअभियंता )**

## सवलतीच्या दरात पुस्तक विक्री काव्यसंमेलन व व्याख्यान

# बार्टीच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शाळा प्रवेश दिनानिमित्त साताऱ्यात कार्यक्रमाचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे/प्रतिनिधी : ७ नोव्हेंबर १९०० हा डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा शाळा प्रवेश दिवस. हा दिवस शासनाने 'विद्यार्थी दिवस' म्हणून साजरा करण्याचे ठरविले असून या निमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे यांच्या वतीने साताऱ्यामध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

दरवर्षी ७ नोव्हेंबर हा दिवस डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा शाळा प्रवेश दिवस म्हणून साजरा केला जातो. हा दिवस विद्यार्थी दिन म्हणूनही साजरा करण्याचे शासनाने ठरविले असून या निमित्त राज्यभर विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. या वर्षी डॉ. बाबासाहेब यांच्या नावाने स्थापन झालेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या वतीने बार्टीचे नियामक मंडळाचे अध्यक्ष तथा सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ.हर्षदीप कांबळे व बार्टीचे महासंचालक सुनील वारे, निबंधक विशाल लोंढे व विस्तार व सेवा विभागाचे प्रमुख डॉ. बबन जोगदंड यांच्या मार्गदर्शनाखाली सातारा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर ज्या शाळेमध्ये शिकले त्या श्रीमंत छत्रपती प्रतापसिंह हायस्कूल जुना राजवाडा सातारा येथे शाळा प्रवेश दिना निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

सकाळी आठ वाजता महाविद्यालयीन शालेय विद्यार्थ्यांची 'समता रॅली' आयोजित करण्यात येणार आहे. ही रॅली प्रतापसिंह भोसले या शाळेपासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापर्यंत जाईल. त्यानंतर दुपारी १.०० वाजता पत्रकार अरुण जावळे यांचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शाळा प्रवेश दिनासंदर्भात व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. त्यानंतर दुपारी दोन वाजता महाराष्ट्रातील प्रसिद्ध असलेल्या कवयित्री रमणी प्रजेंट्स निमंत्रित कवींचे एक वैचारिक कवी संमेलन कविता बाबासाहेबांच्या आयोजन करण्यात आले आहे. हे कवी संमेलन आकाश आप्पा सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे.

त्याचबरोबर डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रशिक्षण व संशोधन संस्थेच्यावतीने वाचकांना महापुरुषांच्या जीवनावरील ग्रंथ सवलतीच्या दरात उपलब्ध करून दिले जाणार आहेत. सवलतीच्या दरात विक्री बुक स्टॉल लावण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचा मोठ्या संख्येने नागरिकांनी विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे दिलीप वसावे जिल्हा प्रकल्प अधिकारी सातारा समतादूत राहुल गंगावणे विशाल कांबळे यांनी बार्टीच्या वतीने आवाहन केले आहे..